# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०६/०४/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पोस्टे कन्हानः– अंतर्गत खदान नं. ०६ कन्हान, पारशिवनी येथे दिनांक ०६/०४/२०२४ चे ०४.०० वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, खदान नं. ०६ कन्हान मधुन एक इसम मोटार सायकलवर बोरीत कोळसा भरून खदान परिसरातुन चोरून घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफ यांनी मोसा. क्र. एम. एच–३६/ए. एम– ७४९१ चा चालक **आरोपी नामे– आकाश अरविंद जगनिक, वय २३ वर्ष रा. सादगडी ता. साकोली जि. भंडारा, हमु टेकाडी साईमंदीर जवळ, नितेश बावनकर यांचा घरी भाडयाने कन्हान** हा डब्लुसीएल खदान नं. ०६ परिसरातुन तिन बोरीत १५० कि.लो. कि. ९००/– चा दगडी कोळसा चोरी करून मोटार सायकल एम.एच–३६–एएम–७४९१ वर बोरीत भरून पळुन गेला होता. त्यास कन्हान पोलिसांने पकडले.

सदरची कार्यवाही ही सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर